ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक शिक्षणातील समस्या आणि आव्हाने

**डॉ. शरद हरी विश्वासराव**
*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय पुणे ४*

## Abstract

*शिक्षक शिक्षक संस्थापुढील समस्या आणि आव्हाने प्रामुख्याने दोन प्रकारची आहेत*
*१. शिक्षक प्रशिक्षणातील समस्या आणि आव्हाने.*
*२. शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करून ज्या क्षेत्रात नोकरीसाठी जातील त्या क्षेत्रातील समस्या आणि आव्हाने.*
*या दोन्ही प्रकारपैकी दुर्स या प्रकारातील म्हणजे शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करून ज्या शाळेत महाविद्यालयात नोकरीसाठी जातात तेव्हा त्या ठिकाणची समस्या आणि आव्हाने जास्त महत्वाची आहेत असे वाटते. ती समस्या आणि आव्हाने पुढीलप्रमाणे*
*१. अध्यापन करण्याचे शास्त्र*
*२. तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर*
*३. सर्वसमावेशक शिक्षण*
*४. विविध अध्यापन पद्धतींचा वापर*
*५. विविध मुल्यमापन तंत्र व साधनांचा वापर*
*६. शालेय विषयांवर कौशल्य*
*७. विविध सहशालेय व अभ्यासेतर उपक्रम राबविण्याचे तंत्र*
*८. वर्ग व्यवस्थापन तंत्र*
*९. समाज व पालक यांच्या अपेक्षा*
*१०. शैक्षणिक क्षेत्राचा विकास*
*या आव्हानांना सामोरे जावयाचे असेल तर त्याचे प्रशिक्षण शिक्षक प्रशिक्षणात मिळणे आवश्यक आहे अन्यथा या आव्हानांची तीव्रता आणखीनच वाढणार आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

कोणत्याही क्षेत्रात प्रगती करावयाची असेल तर त्यात वेगवेगळे प्रश्न व आव्हाने असणारच आहेत. त्या प्रश्नांना किंवा आव्हानांना सामोरे जावूनच किंवा ते सोडवूनच प्रगती साध्य करावी लागणार हे नक्की. शिक्षणक्षेत्र ही त्याला अपवाद असणार नाही. उलट शिक्षण क्षेत्रात येर्णा या समस्या आणि आव्हाने हे इतर क्षेत्रांपेक्षा थोडे जास्तच मोठे असणार आहेत. शिक्षण क्षेत्रातील समस्या आणि आव्हाने सोडविण्याची महत्त्वाची जवाबदारी शिक्षकांना पार पाडावी लागणार आहे व त्या शिक्षकांना सक्षम बनवण्यासाठीची जबाबदारी शिक्षक प्रशिक्षण संस्थांनाच उचलावी लागणार आहे. ही जबाबदारी या संस्था जेवढया जबाबदारपणे पार पाडतील तेवढया सक्षमपणे ही आव्हाने आपण पेलून आपला भारत देश पुढील शतकासाठी समर्थ घडविणार आहोत.

ही आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण संस्थासमोरील आव्हांनांचा पुढीलप्रमाणे विचार करावा लागेल. शिक्षक प्रशिक्षण संस्थापुढील आव्हाने प्रामुख्याने दोन प्रकारची आहेत.

१. शिक्षक प्रशिक्षणातील प्रश्न आणि आव्हाने

२. शिक्षक प्रशिक्षण पूर्ण करून ज्या क्षेत्रात नोकरीसाठी जातील त्या क्षेत्रातील प्रश्न आणि आव्हाने

या दोन्ही प्रकारांपैकी दुस-या प्रकारातील म्हणजेच या प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेऊन शिक्षक जेव्हा विविध शाळा किंवा कॉलेजमध्ये नोकरीसाठी जातील तेव्हा त्या ठिकाणाची आव्हाने जास्त महत्त्वाची आहेत असे वाटते.

वास्तवात शिक्षक प्रशिक्षणाचा सर्व कालावधी संस्थामधील शिक्षण□तेथील प्रश्न आणि आव्हाने सोडविताना संपून जातो. त्यामुळे नोकरीच्या ठिकाणच्या आव्हानांचा विचार करावयास वेळही मिळत नाही. त्यामुळे आमचा शिक्षक तेथील आव्हाने पेलण्यास ब-याच प्रमाणात असमर्थ ठरतो व तेथील आव्हानांची तिव्रता आणखीनच वाढते. म्हणून या आव्हानांचा विचार सविस्तर करणे योग्य ठरेल.

१. **अध्यापन करण्याचे शास्त्र**□शिक्षकाचे प्रमुख कर्तव्य विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणे म्हणजेच अध्यापन करणे होय. परंतू आज ज्ञान मिळविण्याचे भरपूर मार्ग (Sources) विद्यार्थ्यांजवळ उपलब्ध आहेत. उदा. दूरचित्रवाणी□संगणक□माहितीजाल□मार्गदर्शक पुस्तके इत्यादी. याचाच अर्थ विद्यार्थ्यांना हेच ज्ञान वेगवेगळया ठिकाणांकडून मिळत असल्याने ते शिक्षकांकडे ज्ञान मिळविण्याचा एकमेव मार्ग म्हणून बघत नाही. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांकडे पर्यायाने शाळेकडे येईनासे झाले आहेत. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फक्त अध्यापन करण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी कसे शिकावे हे समजून सांगावे. त्यासाठी आवश्यक असणा-या अध्ययनाचे शास्त्र (Science of learning) समजावून द्यावे व त्यानुसार नवनवीन अध्यापन पद्धतीचा वापर करून अध्यापन करावे हे आवश्यक ठरेल .

२. **तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर** (Use of technology in teaching)□अध्यापन करताना शिक्षकाला स्वतःच्या मर्यादा जाणवतात□मग त्या स्पष्टीकरण करण्याच्या असोत किंवा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या असोत तेव्हा शिक्षकाने अध्यापनात तंत्रज्ञान वापरणे गरजेचे असते.

आज तंत्रज्ञानाचे युग असल्याने अध्यापनातील तंत्रज्ञान फार झपाटयाने बदलत आहे. बदलणा्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे हे सुद्धा एक आव्हानच झालेले आहे. आज प्रत्यक्षात विद्यार्थीच शिक्षकाला ते तंत्रज्ञान कसे वापरावे याचे मार्गदर्शन करताना आढळतात ही वस्तूस्थिती आहे. ही परिस्थिती बदलावयास हवी.

३. **सर्वसमावेशक शिक्षण** (Inclusive education)□भारत सरकारने शिक्षण हक्क कायदा २००९ (Right to Education act, 2009) अमलात आणला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण घेण्याचा समान हक्क प्राप्त झालेला असून प्रत्येकाला समान संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात खूप बदल झालेला आहे.

प्रत्येक शिक्षकाच्या वर्गात अंध, अपंग, मतिमंद, आदिवासी, वंचित, अक्षम, वंचित विद्यार्थी असणार आहेत. त्यामुळे शिक्षकाला या सर्व विद्यार्थ्यांना समजेल, प्रत्येकाच्या विकासाला पूरक ठरेल अशा अध्यापन पद्धतींचा स्विकार करून त्या अवगत कराव्या लागणार आहेत. त्याचप्रमाणे त्या पद्धतींपैकी प्रत्येक विद्यार्थ्या ला उपयोगी पडेल अशा अध्यापन पद्धतीचा वापर वर्गात करावा लागेल. त्याचप्रमाणे त्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशा अध्यापन साधनांचा वापर सुद्धा करावा लागेल. मग ती साधने पुस्तके, ऐकणे, लिहिणे, प्रयोगसाहित्य, खेळणे किंवा परिक्षेसाठी उपयोगी साहित्य असेल. या सर्वांची उपलब्धता करून देवून व त्यांचा योग्य उपयोग करून सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दयावी लागणार आहे.

४. **विविध अध्यापन पद्धतींचा वापर** (Use of different teaching methodology)सर्वसमावेशक शिक्षणाचा स्विकार केल्यामुळे एकाच वर्गामध्ये विविध गरजा असणारे, वेगवेगळे बुद्धीगुणांक असणारे, विविध क्षमता असणारे समाजातील विविध स्तरातील विद्यार्थी एकत्र अध्ययन करणार आहेत व त्यांना एकाच वेळेस अध्यापन करावे लागणार आहे. त्यामुळे शिक्षकांना वेगवेगळया आधुनिक अध्यापन पद्धतींचे (Teaching methodology) ज्ञान व कौशल्य असावे लागणार आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे वरील सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास म्हणजेच मानसिक विकास, बौद्धिक विकास, शारीरिक विकास, भावनिक विकास, सामाजिक विकास, सौंदर्य दृष्टीचा विकास, एकाच वेळेस करावयाचा आहे. त्यासाठी शिक्षकाकडे खूप संयम तसेच विविध कौशल्यांचा मिलाप असणे आवश्यक आहे.

५. **विविध मुल्यमापन तंत्र व साधनांचा वापर** (Use of different techniques and tools of evaluation.)शालेय स्तरावर सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन पद्धतीचा स्विकार केलेला आहे.(Continuous comprehensive evaluation technique) या तंत्राच्या साहाय्याने विद्यार्थ्यांचे मार्कांच्या साहाय्याने मूल्यमापन करण्याऐवजी त्यांच्यामध्ये असलेल्या कलागुणांचे मूल्यमापन करण्याच्या विविध पद्धतींचा वापर करण्याचे तंत्र स्वीकारले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मूल्यमापन करण्याच्या विविध पद्धतींचा कौशल्यपूर्ण वापर करण्याचे तंत्र व मूल्यमापनाची विविध साधने उदा. निरीक्षण, प्रकल्प, खेळ, प्रयोग, शिबिरे, इत्यादी. यांचे वापरण्याचे कौशल्य शिक्षकांकडे असणे आवश्यक आहे. मूल्यमापन करत असताना सर्वांगिण विकासाच्या पैलूंचे मोजमाप करणे गरजेचे आहे. म्हणजेच मानसिक विकास, भावनिक विकास, सामाजिक विकास, मूल्य संस्कार, या पैलूंचे मोजमाप कसे करता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. यांच्या मूल्यमापनासाठी कोणकोणत्या मूल्यमापन साधनांची निवड करावी लागेल याचाही विचार करणे गरजेचे आहे. हे सर्व करत असताना आपण बहुतेक वेळा साधनांची परीक्षा घेतो. त्याऐवजी ठरविलेले उद्दिष्ट किती प्रमाणात साध्य झाले हे पाहणे आवश्यक आहे.

६. **विविध शालेय विषयांवर कौशल्य**शाळेत अध्यापन करताना दैनंदिन अध्यापन विषयांबरोबरच मूल्यशिक्षण, गाभा घटकांचे शिक्षण, खेळ, चित्रकला, संगीत, कार्यानुभव, हस्तकला, पर्यावरण, याही विषयांवर प्रभुत्त्व असणे आवश्यक आहे.

७. **विविध सहशालेय व अभ्यासेतर उपक्रम राबविण्याचे तंत्र** (Co- curricular activities & extracurricular activities)शाळेत वेगवेगळे सहशालेय व अभ्यासेतर उपक्रम राबवावे लागतात. उदा.( Annual social, projects, visits, drama, singing, exhibition.) हे उपक्रम राबवित असताना सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घेवून त्यांना सर्वांगिण विकास करण्याची समान संधी उपलब्ध करून देण्याचे तंत्र आवश्यक असते. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यामधील लपलेल्या नैसर्गिक कलागुणांचा अविष्कार करण्याचे कौशल्य आवश्यक आहे.

८. **वर्ग व्यवस्थापन तंत्र** (Classroom management techniques)शिक्षकाला वर्गात अध्यापनाखेरीज इतर बाबींकडेही लक्ष दयावे लागते. उदा. विद्यार्थ्यांचे बेशिस्तीची वर्तणूक, वेळेचे नियोजन, प्रशासकीय कर्त व्ये पूर्ण करणे इत्यादी. यावेळी शिक्षकांकडे वेगवेगळी व्यवस्थापन तंत्रे असणे आवश्यक आहे.

९. **समाज व पालक यांच्या अपेक्षा** शिक्षकांकडून दैनंदिन अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांचे पालक व समाज यांच्या अपेक्षांची पूर्तता करणे आवश्यक असते.शिक्षण हक्क कायद्यामुळे वेगवेगळया जबाबदा यांना तोंड द्यावे लागत आहे. मुलांचे मानसशास्त्र ओळखून त्यांच्याशी वागावे लागते.यादृष्टीने पालकांच्या व समाजाच्या तसेच शालेय प्रशासनाच्या व सरकारच्या पण वेगवेगळ्या अपेक्षा शिक्षकाकडून असतात. प्रत्येक

प्रसंगी पालकांची व समाजाची शिक्षकांकडुन वेगवेगळी अपेक्षा असते त्यांची वर्तन करण्याची पद्धती वेगवेगळी असते. शिक्षकाने या अपेक्षांचा व वर्तन पद्धतींचा अभ्यास करणे आवश्यक असते.

१०. **शैक्षणिक क्षेत्राचा विकास**दैनंदिन अध्यापन करताना शिक्षण क्षेत्राच्या विकासाचा पण विचार शिक्षकाने केला पाहिजे. आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांबरोबरच इतर विद्यार्थ्यांनाही अध्यापनाचा फायदा कसा होईल याचा विचार केला पाहिजे. अध्यापनाला संशोधनाची साथ दिली पाहिजे किंवा स्वतःचे अध्यापन संशोधनावर आधारलेले असले पाहिजे. अध्यापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वर्तनबदल होणे आवश्यक आहे. आपल्या अध्यापनामुळे नुसते पाठयांशाचे हस्तांतरण (Content transfer) न होता, तो पाठयांश ज्याच्यासाठी आहे व ज्या उद्देशाने पाठयक्रमात समाविष्ट झालेला आहे ते उद्दिष्ट साध्य झाले पाहिजे. शिक्षकाचे अध्यापन त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी होणे आवश्यक आहे.

वरील सर्व आव्हानांना सामोरे जायचे असेल तर त्याचे प्रशिक्षण (Training) शिक्षक प्रशिक्षणात मिळणे गरजेचे आहे. परंतु प्रत्यक्षात शिक्षक प्रशिक्षणात या आव्हानांचा विचार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही हे सत्य आहे. म्हणून या आव्हानांची तीव्रता आणखीनच वाढते आहे.